**भारत सरकार,**

**वित्त मंत्रालय,**

**आर्थिक कार्य विभाग**

नवी दिल्ली, दि. ऑक्टोबर 25, 2017

**अधिसूचना**

**सार्वभौम सुवर्णरोखे योजना, अधिसूचना क्र. 4 (25) - डब्ल्यु अँड एम/2017 मध्ये सुधारणा**

(1) जीएसआर : सरकारी प्रतिभूती अधिनियम 2006 च्या (2006 चा 38) कलम 3 च्या खंड (3) ने दिलेल्या अधिकाराचा वापर करुन, केंद्र सरकार, येथे अधिसूचना क्र. एफ.4 (25)- डब्ल्यु अँड एम /2017 दि. ऑक्टोबर 6, 2017 [अधिसूचना क्र. जीएसआर 1225 (ई)] अन्वये अधिसूचित केलेल्या सार्वभौम सुवर्ण रोखे योजनेच्या खंड 13 मध्ये विहित केलेल्या अटींमध्ये सुधारणा करत आहे.

(2) मूळ अधिसूचनेतील खंड 13 ऐवजी पुढील मजकुर देण्यात आला आहे.

’**13. वैधानिक तरलता गुणोत्तरासाठी पात्रता** : केवळ लिएन/तारण/प्लेज ची प्रक्रिया आवाहित करुन बँकांनी मिळविले रोखेच, वैधानिक तरलता गुणोत्तरासाठी ग्राह्य समजले जातील’